पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३२ • जुलै २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## कामगार दिंडी आळंदी-पुणे चा भव्य सोहळा

कामगार कल्याण विभागामार्फत आळंदी ते पुणे कामगार दिंडीचे दि.१/७/१३ रोजी आयोजन करण्यात आले होते. दिंडीत जवळपास २५० अधिकारी/सेवक सहभागी झाले होते. पुणे मनपा भवनापासून सकाळी ६.३० वाजता दिंडीचे प्रस्थान झाले. सहभागी वारकऱ्यांनी व वारकऱ्यांचे स्वागत करणाऱ्या मान्यवरांनी दखल घेवून उत्तम प्रतिसाद दिल्याचे अनुभवास आले. या कामगार दिंडीचे सर्वत्र उत्स्फूर्तपणे स्वागत करुन दिंडी प्रमुखांचा श्रीफळ व स्मृतीचिन्ह देवून सत्कारही करण्यात आला. म्हस्के वस्ती येथे मा. महापौर,



साईबाबा मंदीराजवळ सदर दिंडी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झाली.

या ठिकाणी श्री.नरसिंगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अल्पोपहार व चहापान व्यवस्था केली होती. दिंडीमध्ये काही समाजप्रबोधनपर फलक तयार करण्यात आले होते. सारे करुया एक निर्धार-वृक्षलागवडीचा विचार छान, प्रदूषण टाळण्याचा मार्ग महान, पीएमपीएमएल ने करु प्रवास, आळा बसेल प्रदुषणास, पाणी हे जीवन आहे हे व्यर्थ घालवू नका, असेल आनंदी नारी, सुख फुलेल घरोघरी, इत्यादी प्रबोधन फलक हातात घेवून सहभागी वारकऱ्यांमध्ये पर्यावरण, आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता, नागरी सुविधा, याबद्दल जागृती निर्माण करुन प्रबोधनाचा यशस्वी उपक्रम राबविला. मा.श्री.शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार), मा.श्री.विलास कानडे, सह महापालिका आयुक्त, स्थानिक संस्था कर, मा. ॲड. निशा चव्हाण, ज्युनिअर लिगल असिस्टंट, मा.श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन व युनियनचे इतर पदाधिकार. मा. कानडे साहेब व मा. दौंडकर साहेब यांनी कर्मचारी भजनी मंडळाबरोबर उत्स्फूर्तपणे भजनात सहभाग घेतला. भजन म्हणण्यामध्ये कर्मचारी श्री. विठ्ठल जगदाळे, श्री. नागनाथ गायकवाड, श्री.आप्पा गवारे, इत्यादी अनेक कर्मचारी अग्रेसर होते. या अभिनव उपक्रमाची बहुसंख्य पुणे, सौ.वैशाली बनकर यांनी महिला कर्मचाऱ्यांबरोबर फुगडी खेळली व तुळशी वृंदावन डोक्यावर घेवून क्षणिक वारकरी सुखाची अनुभूती घेतली. या कामगार दिंडीमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी/सेवकांसाठी राम सोसायटीत श्री.रमेश काथवटे, श्री.शिवाजी घारे, श्री. रमेश गायकवाड, श्री.सिद्राम सिंदगी व श्री.अशोक ढगे यांनी घरगुती भोजनाची उत्तम व्यवस्था त्यांच्या मित्र व सर्व कुटुंबियांच्या सहकार्याने केली होती. त्यांच्या या सहकार्याबद्दल सर्वांनी त्यांना व कुटुंबियांना धन्यवाद दिले व श्रीफळ देवून सत्कार केला. त्यानंतर दिंडीचे पुढील मार्गक्रमण सुरु झाले.

सायंकाळी ४.३० वाजता दिंडी सोहळा मनपा भवन येथे पोचला. या ठिकाणी हिरवळीवर भजनाचा कार्यक्रम झाला, हरिपाठ झाला व शेवटी पसायदानाने दिंडीचा समारोप झाला. दिंडी उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या श्री. किशोर पोळ, व्हेईकल डेपो, श्री. जयंत पवार, व्यवटे, श्री.घारे, श्री.सिंदगी, श्री. ढगे, श्री. गायकवाड या सर्वांचे कामगार कल्याण निधीतर्फे विशेष आभार. कारण त्यांच्या उत्स्फूर्त व सक्रीय सहभागामुळेच हा दिंडी सोहळा उपक्रम यशस्वी झाला. दैनंदिन कामाबरोबर सामाजिक बांधिलकीच्या नात्याने करण्यात येणारे हे कार्य उत्तरोत्तर असेच वृध्दिंगत होत जावो व त्यामध्ये सर्वांचा स्नेह आहेच तो उत्तरोत्तर वृध्दिंगत व्हावा, हीच माउलींच्या चरणी प्रार्थना.

## नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला सबलीकरण व सक्षमीकरण केंद्राचे उद्घाटन

पुणे महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत नगररोड क्षेत्रीय कार्यालय येथे महिला सबलीकरण व सक्षमीकरण केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन प्रभाग समिती अध्यक्ष मा. श्रीमती सुनंदा देवकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास मा. डॉ.सिध्दार्थ धेंडे, मा. श्री. कर्णे गुरुजी, मा. सौ. मिनल सरवदे, मा. श्री. सचिन भगत, मा. श्री. हनुमंत भोसले, प्रकल्प अधिकारी, समाजसेवक श्री. नंदू कांबळे, नगररोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत काम करणाऱ्या समुहसंघटिका व नगररोड विभागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. हनुमंत नाझिरकर, प्रकल्प संचालक यांनी केले. सदर केंद्राचा उद्देश वस्तीपातळीवरील व अल्प उत्पन्न गटातील महिलांसाठी कौटुंबिक सल्ला व मार्गदर्शन, महिलांविषयी कायदे, महिलांचे मानसिक वैचारिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्टया सक्षमीकरण करणे हा आहे. याव्यतिरिक्त या केंद्रामध्ये महिला आर्थिक सबलीकरणासाठी पुणे मनपाच्या, महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या सर्व योजना, जिल्हा महिला बाल कल्याण समितीच्या योजना व बँकेच्या योजना, महिला आरोग्याबाबत योजनांची माहिती महिलांना उपलब्ध होणार आहे. त्यासाठी एम.एस.डब्ल्यु. पात्रता असलेली समुपदेशिका नेमण्यात आलेली आहे. तसेच, पुणे महानगरपालिका हद्दीतील गरजू, अत्याचारीत महिलांना कायदेशीर मदत मोफतपणे देणे हा आहे. कायद्याचा अधार घेवून महानगरपालिकेच्या वकिलांमार्फत केसेस मोफत सोडविल्या जाणार आहेत. महिलांचे संघटीकरण, स्वसंरक्षण, स्त्री अस्तित्व ओळख, महिलांकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन याबाबत जाणीव जागृती कार्यक्रमातून होणार आहे. महिला दक्षता कमिटी, महिला सहाय्य कक्ष, पोलिस चौकी, इत्यादी विषयी माहिती देण्यात येणार आहे. पुणे शहरातील इतर संस्थांची माहिती व मदत या सबलीकरण केंद्रातून मिळणार आहे. वैकल्पिक वाद निवारण केंद्र तसेच तात्पुरत्या निवाऱ्याची सोय इत्यादी मदत केली जाणार आहे.

मा. श्री. कर्णे गुरुजी यांनी शहरी स्वयंरोजगार योजनांचा लाभ घेण्याबाबत महिलांना आवाहन केले. मा. डॉ. धेंडे यांनी महिलांचे मानसिक सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले. या प्रंसगी मा. सौ. मीनल सरवदे व मा. सुनंदा देवकर यांनी मार्गदर्शन केले.

मा.श्री. हनुमंत नाझीरकर यांनी महिला सबलीकरण केंद्राविषयी सविस्तर माहिती दिली. पुणे शहरात ५ कौटुंबिक सल्ला केंद्रे सुरु असून नव्याने १० केंद्रे क्षेत्रीय कार्यालयात सुरु होणार आहेत. प्रत्येक केंद्रात आलेली केस ही गोपनीय असणार आहे. प्रत्येक केसला परिस्थितीनुसार सल्ला व कायदेशीर मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच, महिलांनी सक्षम कसे व्हावे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नंदू कांबळे, समाजसेवक यांनी तर आभार प्रदर्शन मा.श्री. हनुमंत भोसले, प्रकल्प अधिकारीयांनी केले.

## पुणे महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत पुणे महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता




शुक्रवार दिनांक २६/७/२०१३ रोजी श्री. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, पुणे मनपा भवन येथे नेत्रतपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरामध्ये टायटन इंडस्ट्रिज लि. या संस्थेमार्फत पुणे मनपाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली.

मा. श्री. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांचे हस्ते दिपप्रज्वलन करुन सदर नेत्रतपासणी शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी मा. डॉ.एस.टी.परदेशी, आरोग्य प्रमुख, मा.श्री. मंगेश जोशी, उप आयुक्त (ज), मा. डॉ अंजली साबणे, उप आरोग्य प्रमुख हे उपस्थित होते.

दैनंदिन आयुष्यात कर्मचाऱ्यांनी डोळ्यांचे आरोग्याबाबत घ्यावयाची काळजी याबाबत मा. राजेंद्र जगताप व मा.डॉ. एस.टी.परदेशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सदर नेत्रतपासणी शिबीरास कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ३५० मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदर शिबिरामध्ये नेत्रतपासणी करुन घेतली.

यापैकी ३०% व्यक्तींना चष्मा वापरण्याची गरज असल्याचे तसेच चष्मा वापरत असलेल्या ३०% व्यक्तींचे चष्म्याचे क्रमांकामध्ये बदल झाल्याचे निदर्शनास आले.

## ओळख गुणवंताची – बंडू उर्फ खंडू लक्ष्मण कसबे

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्री. बंडू उर्फ लक्ष्मण कसबे यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्री. बंडू उर्फ लक्ष्मण कसबे यांचा जन्म दिनांक १७ जून, १९६५ रोजी गंजपेठ येथे झाला. प्राथमिक शिक्षण डी.एस.गायकवाड स्कुलमध्ये झाले. दिनांक २६/९/१९७४ रोजी वडिलांचे अपघाती निधन झाल्याने त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. त्यांचे वडिल पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागात बिगारी म्हणून कामास होते. वडिल गेल्याने श्री. कसबे यांचे कुटुंबियांना अत्यंत हालाखीचे दिवस आले. घरमालकाने घर खाली करुन घेतल्याने आई आणि ते चार भावंडे काशेवाडी झोपडपट्टी येथे राहण्यास गेले. दोन महिने श्री. कसबे यांनी हॉटेलमध्ये काम केले. काम करत असतानाच पुन्हा डी.एस.गायकवाड स्कुलमध्ये चौथीमध्ये प्रवेश घेतला व चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. इयत्ता पाचवीला महात्मा ज्योतिबा फुले (आदमबाग) या शाळेत प्रवेश घेतला. शाळेत हुषार असल्याने कास्प या संस्थेमार्फत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत शालेय साहित्य, गणवेष, इत्यादी त्यांना मोफत मिळत असे. दहावी नापास झाल्यानंतर त्यांनी हार फुले विकण्यास सुरुवात केली. त्यानंतर हॉटेल ब्यू डायमंड व खंडाळा येथील फरियाज हॉटेल, रुबी हॉल, आपटे रोडवरील कोहीनूर हॉटेल या ठिकाणी पेस्ट कंट्रोलचे काम केले. त्यानंतर श्री. कसबे पुणे महानगरपालिका जन्म मृत्यू नोंदणी विभागाजवळ अर्ज लिहिण्याचे काम करु लागले. सदर कामाचे त्यांना रोज ४० रुपये मिळत असत. मनपा भवनामध्ये अॅड. काळुराम खवळे यांचेकडे ते लिखानाचे काम करु लागले.या कामाचे १००-१५० रुपये त्यांना मिळू लागले. त्यांच्या सहवासात सामाजिक कामाची आवड निर्माण झाली. श्री. कसबे त्यांच्या गल्लीतील सम्राट अशोक मंडळाच्या माध्यमातून भागातील नागरिकांच्या तक्रारी सोडविण्याचे काम करु लागले. पोलिस चौकी, एमएसईबी, रेशनिंग ऑफिस या ठिकाणी त्यांचा संपर्क वाढला. मंडळाच्या माध्यमातून बालवाडी सुरु केली. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. खानवडी गावातील महात्मा फुल्यांचे दगडाचे पडलेले घर होते, त्या ठिकाणी भव्य सांस्कृतिक भवनाची उभारणी सहकाऱ्यांच्या मदतीने केली. कै. हिरामण जाधव, नगरसेवक यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिरे/प्रतिष्ठान चालविले. दलित स्वयंसेवक संघ/मातंग एकता आंदोलन या संघटनेत ते काम करत आहे..

दिनांक १९ मार्च, १९९४ साली श्री. कसबे यांचा विवाह झाला व ऑक्टोबर, १९९४ साली ते मनपा सेवेत खाडे रोजंदारी म्हणून रुजू झाले. सन १९९७ साली ते सम्राट अशोक मंडळात अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बहुमताने निवडून आले व अध्यक्ष झाले. त्यानंतर वस्तीमधील अडचणी साडविणेसाठी प्रसंगी झोपडपट्टी दादाशी दोन हात करण्याची त्यांची तयारी होती. नागरी सुविधांसाठी लढा दिला. श्री. कसबे यांच्या दोन्ही मुली अपंग होत्या. आई व पत्नीच्या सततच्या भांडणामुळे पद्मावती येथील तळजाई झोपडपट्टीत भाड्याने घर घेवून वेगळे राहू लागले. दिनांक १७/७/२००५ रोजी श्री कसबे यांना तिसरी मुलगी झाली. आधीच्या दोन मुलींप्रमाणेच ती सुध्दा अपंग निघाली. त्यामुळे दु:खात आणखी भर पडली. त्यातच घरमालकाने घर खाली करण्यास सांगितले. या अडचणीच्या काळात पुणे मनपा गणेश सहकारी बँकेने त्यांना एक लाख रुपयांचे कर्ज मंजुर केले व त्यांनी स्वत:चे घर घेतले.

घोलेरोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एस.एन.डी.टी. कॅनॉल रोड हजेरी कोठी येथे प्रभारी मोकादम म्हणून श्री. कसबे यांना काम करण्यास संधी मिळाली. त्यामुळे प्रभागातील नागरिकांना भेटण्याची संधी मिळाली. एक चांगला कामगार म्हणून लोक त्यांच्याकडे पाहू लागले. नानासाहेब



परुळेकर सकाळ पेपर ट्रस्टच्या वतीने स्वच्छता मोहिम राबविली गेली. त्या वेळी श्री. कसबे यांनी प्रभाग क्र. ५६ चा प्रथम क्रमांक मिळविला. त्यांचा लायन्स क्लबच्या वतीने डेक्कन जिमखाना सोसायटीच्या हॉलमध्ये सकाळ ट्रस्टच्या सौ जोशी मॅडम व लायन्स क्लबचे अधिकारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. उच्चशिक्षित नागरिकांच्या सानिध्यात झालेल्या सत्काराचा आनंद श्री. कसबे यांना खूप काही सांगून गेला. तेंव्हापासून श्री. कसबे आपल्या तीन मुली अपंग असल्याचे दु:ख विसरुन गेले आहेत व आपल्या पत्नीसह ते त्यांच्या सेवेसाठी सतत सतर्क राहतात. त्या आता पुणे महानगरपालिकेच्या आंग्रे विद्यालय या शाळेत शिकत आहेत.

श्री. कसबे यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याची दखल घेवून पुणे महानगरपालिका कामगार कल्याण निधीमार्फत त्यांना सन २००९-१० चा गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल, त्यांना दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल महानगरपालिकेतील अधिकारी मा. श्री. शिवाजी दौंडकर साहेब, मा.श्री. विजय दहिभाते साहेब, मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे महापालिका कामगार युनियन, मा. श्री. लांडगे साहेब, मा.डॉ. संजीव वावरे सासहेब, मा. श्री. अनंत घडशी, विभागीय आरोग्य निरीक्षक, मा. श्री. गणेश खिरीड, आरोग्य निरीक्षक, मा. विकास मठकरी, नगरसेवक, मा. माधुरीताई सहस्त्रबुध्दे, सौ. प्रसादे मॅडम, श्री. देशपांडे साहेब, श्री. अमित अगरवाल, श्री. येरवडेकर, श्री. शेखर जोशी, श्री. साठे काका, श्री. पाठक काका, श्री. देशमुख साहेब, श्री. जठार, श्री. सावरकर, डॉ. जोग, सौ. करकरे मामी, सौ. उर्मिलाताई आमटे, श्री. जोशी काका, श्री. देव या सर्वांचे ते ऋणी आहेत. श्री. कसबे यांच्या भविष्यकालीन वाटचालीस त्यांना कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## सत्यशोधक नाटक नव्हे, एक चिल्ला

नमस्कार! सर्वात आधी पुणे महानगरपालिका कामगार युनियन, कॉ.मुक्ता मनोहर, तसेच आमच्या प्रयोगांकरीता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या झटणाऱ्या त्या असंख्य हातांचे व शुभचिंतकांचे आभार मानून मी माझे मनोगत आपल्या समोर मांडतो. आपण सगळेच आपल्या जीवनांत नवीन वेगळं काहीतरी घडावं या अपेक्षेने जगत असतो. परंतु सगळ्यांनाच सगळं करणं जमतं असं नाही. याचं कारण आम्ही पुणे मनपातील सफाई कामगार असून देखील आम्हांला आमच्या पुणे महानगरपालिका कामगार युनियनच्या माध्यमातून काहीतरी वेगळं म्हणजेच कलापथक असो किंवा सत्यशोधक नाटक असो करण्याची संधी मिळाली हे खरंतर आमचं सद्भाग्यच आहे असं मी मानतो.

या नाटकाच्या निमित्ताने माझ्या मनात आलेले काही विचार, काही अनुभव मी आपणा सर्वांसमोर मांडू इच्छितो.

**❖युनियनची भूमिका –**

• केवळ कामगार म्हणून असलेल्या व्यक्तिंचा सर्वांगीण विकास करणे व त्यांच्यातील कलागुणांना पूर्ण वाव देणे –

आजपर्यंत युनियन या संज्ञेचं लोकांमध्ये असलेलं रूप आणि आम्ही अनुभवलेलं रूप यात नक्कीच खूप फरक आहे. पुणे महानगरपालिका कामगार युनियन व युनियनच्या जनरल सेक्रेटरी कॉ. मुक्ता मनोहर या दोन नावांशिवाय हा लेख पूर्ण होऊच शकणार नाही. पुणे मनपा कामगार युनियन ही पुणे मनपातील सफाई कामगार, तसेच इतर खाती व विभागातील कामगारांकरीता गेली ७० वर्षांपासून अविरत झटणारी ट्रेड युनियन आहे. एवढंच नाही तर आजपर्यंत कामगारांना वेळेवर वेतन देणे, सानुग्रह अनुदान मिळवून देणे, रोजंदारी कायम करणे आणि सर्वांत अलिकडचे उदाहरण म्हणजे सहावा वेतन आयोग (वेतन श्रेणी सुधारणा) मिळवून देणे अशी महत्वाची भूमिका या युनियनने निभावलेली आहे, निभावत आहे.

• महात्मा फुले यांचे विचार पुन्हा एकदा नव्याने समाजापुढे आणणे –

याचं दुसरं कारण म्हणजे अतुल पेठे यांनी महात्मा जोतिबा फुले व त्यांचे विचार पुन्हा एकदा समाजासमोर आणणे. आमची युनियन ही लाल बावटा खांद्यावर घेणारी व



**श्री. संदिप मोरे**
**घनकचरा व्यवस्थापन कार्यालय**

कामगार हितासाठी झटणारी संघटना असल्यामुळे हेच खरं माध्यम नाटकासाठी किंवा समाजप्रबोधनासाठी योग्य आहे असंही कारण नाकारता येत नाही. आम्ही सर्व सफाई कामगार ज्यांनी आजपर्यंत फक्त कुठेतरी कार्यक्रमांत म्हणजे मोर्चात, आंदोलनांत किंवा फारतर युनियनच्या अंतर्गत कार्यक्रमांमध्ये गाणी, निवेदन असं काही केलं आहे, यांना घेऊन समाजापुढे जायचं हा एक धाडसी व नवी वाट चोखळणारा निर्णय आहे. आजपर्यंत लोकांची रस्त्यावरील घाण, गटारातील घाण साफ करण्यापलिकडं ज्यांना काही माहीत नाही त्यांच्याकडून समाजातील धर्म, जातपात यातील विचारांची साफसफाई करण्याचा निर्णय म्हणजे केवळ एक दिव्य स्वप्नच म्हणावं लागेल. पुढे ते यशस्वीपणे साकारलंही.

**❖नाटकाचा विषय आणि आम्ही –**

सुरूवातीला हे काही दिवस किंवा महिने काहीतरी घेतील व सोडून देतील इतपतचआमची मानसिक तयारी होती. सुरूवातीला अतुल पेठेंनी काही शारीरिक व मानसिक व्यायाम प्रकार घ्यायला सुरूवात केली, ज्यामुळं आम्हाला अत्यंत सुखद, मनाला शांत करणारं सगळं होतं. त्यानंतर मात्र जसं महात्मा जोतिबा फुलेंचं चरित्र वाचण्यास सुरूवात झाली तसं डोक्याला सुन्न करणारं, मनाला सुन्न करणारं असं काहीतरी आपण अनुभवतोय याचा प्रत्यय यायला सुरूवात झाली.

महात्मा जोतिबा फुलेंचा काळ, त्या काळात असणारी जातपात, वर्ण व्यवस्था. त्याचा परिणाम सर्वसामान्य व विशेषत: शुद्रातिशुद्र यांच्यावर कशाप्रकारे होत होता? याचा अत्यंत विखारी अनुभव आम्हांला जोतिबा फुलेंचे चरित्र वाचताना येऊ लागला. याआधी जातपात, धर्म हे शब्द केवळ काही व्याख्याने व चर्चासत्रांमधून ऐकत असू. परंतु त्याचा अर्थ व भेदक रूप महात्मा फुलेंच्या चरित्रातून आमच्या डोळ्यासमोर उभं राहत होतं. बालविवाहाची पद्धत, विधवांचं केशवपन, त्यांच्यावरील अत्याचार, शुद्रातिशुद्रांची त्या काळात असलेली परिस्थिती, पाणी पिण्यासाठी मोजावी लागणारी किंमत आम्हांला आमच्या पूर्वजांची, आधीच्या पिढ्यांची आठवण करून दिल्याशिवाय राहिली नाही.

जसं जसं महात्मा फुलेंचं चरित्र पुढे सरकत होतं तसं तसं आमच्या विचारातील-आचारातील बदलही बदलण्यास सुरूवात झाली. याचं उदाहरणच द्यायचं झालं तर मी या नाटकाच्या प्रक्रियेपूर्वी काही दिवस आधी सोमवारचा उपवास करण्यास नुकतीच सुरूवात केली होती. माझ्या प्रमाणेच इतरही लोक उपवास करीत होती. परंतु अतुल पेठेंनी सांगितलेल्या काही सूत्रांपैकी 'योग्य आहार व भूक असेल तेव्हाच खाय', 'उपवास म्हणजे व्रत वैकल्य नसून रोजच करण्याची गोष्ट आहे', याप्रमाणे आम्ही आचरण करण्यास सुरूवात केली. साधारण दोन महिन्यातच मी तो उपवास करण्याचं बंद केलं. या चरित्र वाचनांतून महात्मा फुलेंनी मांडलेला निर्मिकाचा अर्थ अनेक प्रश्नांची निर्मिती व अनेक प्रश्नांची उत्तरे देणारा असाच ठरला. देव नाही परंतु देवासारखीच दुसरी एखादी शक्ती या सर्व विश्वामध्ये आहे याचा बोध नव्याने घडला. देव आहे अथवा नाही माहित नाही? परंतु आपण त्याचा विचार करतांना किती डोळे झाक करून करतो याचाही प्रत्यय येऊ लागला. त्याहीपेक्षा देवाच्या नावाचा वापर काही मंडळी आपल्या स्वार्थासाठी, सोयीसाठी कसा करतात याचा चांगलाच प्रत्यय आला.

महात्मा फुलेंनी शिक्षणाचा प्रचारकी थाट न करता प्रत्यक्ष मुलींना शिकविण्यासाठी आपल्याच पत्नीला तयार केलं. त्यासाठी शेण, दगड-धोंडे खावे लागले तरी बेहत्तर. कुठुन आली असेल ही बाणी वृत्ती, कुठून आला असेल एवढा स्वाभिमान? याचा परिणाम म्हणूनच की काय मी माझ्या बायकोला नाटकाच्या सरावाच्या वेळी घेऊन यायला लागलो व बघता बघता नाटकांत मी, माझी मुलगी व माझी बायको असं आमचं अख्खं कुटुंबच उतरलं.

**❖नाटकातून काय मिळाल?**

मला मुद्दाम सांगायला आवडेल की या नाटकाच्या आधी अनेक नाटक मी पाहिली. ती सुद्धा किमान ३ ते ५ वेळा. वऱ्हाड निघालं लंडनला, यदा-कदाचित, मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी ते आत्तापर्यंत नाटकं पाहतोच आहे. परंतु या नाटकांच्या निमित्ताने एक गोष्ट पक्की कळाली ती म्हणजे एखाद्या नाटकाचा जन्म कसा होतो? त्याची पूर्वतयारी म्हणजे काय? ते बसविताना काय करावं लागतं? सर्वात शेवटी महत्वाचं म्हणजे ते उभारायचं कसं?उभारल्यानंतरही आलेल्या संभाव्य अडचणींना तोंड द्यायचं कसं? आमचं आधी वाचनं, मग एकाग्रतेसाठी व्यायाम प्रकार, मग वाचनाच्या माध्यमातून विचारांचा प्रवाह एक करणं, त्यात आपल्याला हवं तसंच घडतंय ना याची जाणीव ठेवणं, त्याच बरोबर भूमिकेप्रमाणे माणसांची पारख करणं, त्यांच्याकडून संवाद पाठ करून घेणं, यानंतरही आपल्याला हवं तसंच नाटक घडेल यासाठी दक्ष राहणं.

आम्ही सर्वजण म्हणजे एका माहित नसलेल्या ठिकाणी आपली होडी किनारा गाठेल की नाही? अशी अवस्था असणारे प्रवासी होतो. परंतु कोणीतरी एकाने आधी अनुभव असल्याने त्या होडीचं प्रमुख पद स्विकारलेलं होतं त्यामुळं जे होईल ते बघू अशाच अविर्भावात आम्ही सर्व प्रक्रिया अगदी आनंदाने पार केल्या. याचा अर्थ आम्ही आजच्या घडीला अगदी नामवंत कलाकार झालो असा अजिबात होत नाही. एखाद्या लहान गटातील नवीन प्रवेश घेतलेल्या मुलासारखेच आम्हीही दरवेळी प्रत्येक प्रयोगाला नवीन जग असल्यासारखंच अनुभवतो हे मुद्दाम सांगतो. नाटक म्हणजे विंगा, मोठ मोठे दिवे, मोठाले सेट, हसणं-रडणं आणि मधेमधे एखादे गाणे. अशी ढोबळ

पान क्र.४ वर

# पुणे महानगरपालिका कामगार दिंडी - सुखद अनुभव

सौ.अलका जोशी,
सल्लागार (कामगार) कार्यालय

देहाची पालखी, आत्माराज आत,
चालतसे दिंडी, जीवनाची वाट।।
कृपा ज्ञानीयाची, झडावे तिमीर,
ओळख माझीच, पटावी सत्वर।।
सुटावी मागुती, विषयांची ओस,
संसारात देई, निवृत्ती मनास।।
श्रध्दाशील मना, लाभावे लोचन,
सापडो जवळी, भक्तीचा सोपान।।
पोचावी पालखी, विठ्ठलाचे दारी,
मिळो मुक्ती तेथे, दिंडीच्या अखेरी।।

खरेच पुराणकाळापासून अध्यात्म सांगते की, आत्मा हा परमेश्वराचा अंश आहे, शरीर नश्वर, व्यर्थ आहे. त्याप्रमाणेच जीवन ही एक प्रकारे यात्राच आहे. मग जीवन हे एक दिंडीच होईल। दिंडी म्हणजे काय? तर संपूर्ण महाराष्ट्राचं लाडकं दैवत, विठ्ठल. आळंदीचे माउली (ज्ञानोबा), देहूचे तुकोबा हे भक्तीशिरोमणी, यांचे दैवत म्हणजे विठोबा. पंढरपुरातील. म्हणूनच आम्ही या आमच्या दैवतासोबत, त्यांच्या दैवताला भेटण्यास तहानभूक विसरुन, उन वारा पाउस झेलत. उल्हासात आनंदाने दिंडीसोबत आपल्या उद्दिष्टांप्रती चालत असतो.

होय होय वारकरी
करी पंढरपूरची वारी
ज्ञानोबा तुकोबा वाचे उच्चारी
तहान भूक विसरती सारी

पण खरे सांगायचे झाले तर तुम्ही-आम्ही श्रमिकवर्ग श्रमिकांना श्रम हेच दैवत असते. म्हणूनच म्हणतात, जिथे राबती हात तेथे हरि. आपल्याला या नौकरीमुळे इच्छा असूनही या वारीचा, दिंडीचा अनुभव घेता येत नाही. पण पुणे महानगरपालिका कामगार दिंडी हा सल्लागार कार्यालयाने चालू केलेल्या या स्तुत्य उपक्रमाने काही अंशी का होईना या ब्रह्मानंदाचा आनंद घेता आला. टाळमृदंगाचा गजर... भक्तिरसाने ओथंबलेले वातावरण.. ढगाळ वातावरणात पावसाच्या सरी झेलत.. ज्ञानोबा माउली तुकाराम, एकनाथ, नामदेव, सोपान, मुक्ताबाई या जयघोषात पुणे महानगरपालिका कर्मचारी माउलीच्या भक्तिरसात न्हाउन गेले.

तुकाराम महाराजांनी म्हटले आहे की,

हाती बाण हरिनामाचे।
वीर गर्जती विठ्ठलाचे।।
सहस्त्र नामाची आरोळी।
एक एकाहुनि बळी।।
पर्जन्याचे काळी वादळाचे नाद।
ओसरतो बुंद न यारे चि।।
पिटू भक्तीचा डांगोरा।
कळिकाळासी दरारा।।

या भक्तिभावाने सर्व अधिकारी, कर्मचारी जयघोषात रंगून गेले होते. आळंदीहून परत येताना दिघीत एआयटी कॉलेजजवळ सर्वांनी बसून एकत्र अभंग गाईले. एक ते दिड तास जवळजवळ अभंग सर्वजण गात होते. या कामगार दिंडीत एक विशेषत्वाने जाणवले की, अधिकारी आणि कर्मचारी एकरुप झाले होते. ज्याप्रमाणे तीळ आणि गुळ लाडू केल्यानंतर एकजीव होतात, त्याप्रमाणेच अधिकारी आणि कर्मचारी हा भेदभाव विसरुन फक्त भक्त वारकरी झाले होते. तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे -

विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म।
भेदाभेद भ्रम अमंगळ।।१।।

हा अभंग इथे या कामगार दिंडीमध्ये संयुक्तिक ठरतो. अधिकाऱ्यांमध्ये मा. श्री. शिवाजी दौंडकर साहेब, सल्लागार (कामगार), मा. श्री.विलास कानडे, सह महापालिका आयुक्त, मा. श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी हे दिंडीमध्ये कर्मचाऱ्यांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होते. हातात टाळ, पांढरा गणवेष, भाळी चंदनाचा टिळा, डोक्यावर टोपी या वेशभूषेमध्ये पुणे महानगरपालिकेचा दिंडी सोहळा होता. जसे बदकांच्या माळेमध्ये राजहंस शोभून दिसतात अगदी त्याप्रमाणेच आमचा अधिकारी वर्ग राजहंसाप्रमाणे कर्मचाऱ्यांमध्ये शोभून दिसत होता. टोपी म्हणजे काय तर मत कहो की सर पे टोपी है। कहो सर पे हमारे ताज है।

खरंच, हा पेहराव एक दिवस तरी मी पण हरवणारा होता. भक्तिरस चाखून ब्रम्हानंदाची अनुभूती घ्यावयास लावणारा होता. सर्वांनी स्त्री कर्मचारी वर्ग, अधिकारी, कर्मचारी वर्ग यांनी फुगड्या खेळल्या. एक दिवस तरी हा कोणताही भेदभाव कोणाच्याही मनाला शिवला नाही. म्हस्के वस्ती येथे मा. महापौर, पुणे, सौ.वैशाली बनकर यांनी महिला कर्मचाऱ्यांबरोबर फुगडी खेळली व तुळशी वृंदावन डोक्यावर घेवून क्षणिक वारकरी सुखाची अनुभूती घेतली. त्यामुळे आमच्या महिला कर्मचाऱ्यांचा आनंद द्विगुणीत झाला.

पुढे कामगार दिंडीने कळसमध्ये पुणे मनपा सेवानिवृत्त सेविका सौ. भारती मॅडम यांच्या घरी अल्पोपहार आणि चहापानाचा आस्वाद घेवून थोडेसे विसावून दिंडी पुढे पंथस्त झाली.

नाम घेता उठाउठी।
होय संसाराची तुटी।।१।।

तो पूर्ण दिवस खरेच सर्वजण नोकरी, संसार विसरले होते. नंतर राम सोसायटी, विश्रांतवाडी येथे श्री. अशोक ढगे, श्री. रमेश काथवटे, श्री. रमेश गायकवाड, श्री. सिताराम सिंदगी, श्री. शिवाजी घारे यांनी सर्व पुणे मनपा दिंडीसाठी भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. तेथेही भजनाचा कार्यक्रम रंगला. मा. कानडे साहेब व मा. दौंडकर साहेब यांनी कर्मचारी भजनी मंडळाबरोबर उत्स्फूर्तपणे भजनात सहभाग घेतला. थोड्याशा विश्रांतीनंतर दिंडी मनपा भवनकडे मार्गस्थ झाली. भजन म्हणण्यामध्ये कर्मचारी श्री. विठ्ठल जगदाळे, श्री. नागनाथ गायकवाड, श्री.आप्पा गवारे, इत्यादी अनेक कर्मचारी अग्रेसर होते.

पुणे मनपा कामगार दिंडीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दिंडीमध्ये काही समाजप्रबोधनपर फलक तयार करण्यात आले होते. वृक्षसंवर्धन, सक्षम नारी, पाणी वाचवा, स्वच्छता, ओला कचरा, स्त्री भृणांचा स्विकार, पीएमपीएमएलचा प्रवास सुरक्षित प्रवास, इत्यादी. हे समाजप्रबोधनपर नामफलक सर्वांचे लक्ष वेधत होते. सारे करुया एक निर्धार, वृक्षलागवडीचा विचार छान, प्रदूषण टाळण्याचा मार्ग महान, पीएमपीएमएल ने करु प्रवास, आळा बसेल प्रदुषणास, पाणी हे जीवन आहे हे व्यर्थ घालवू नका, असेल आनंदी नारी, सुख फुलेल घरोघरी, इत्यादी.

याप्रमाणे अनेक समाजप्रबोधनपर बोधवाक्यही या कामगार दिंडीमध्ये सहभागी केले होते. या दिंडीमध्ये सहभागी झाल्याने वारकऱ्यांच्या आनंदाची पर्वणी काय असते याचा थोडक्यात तरी आनंद लुटता आला.

पुर आला आनंदाचा।
लाटा उसळती प्रेमाच्या
जयघोष ज्ञानोबा तुकारामाचा।
नाम रंगी रंगले भक्तिच्या

या भक्तिमय नामसागरात सर्वचजण स्वत:ला विसरुन गेले होते. हासत, नाचत, खेळत आपली कर्मभूमी हेच पंढरपुर म्हणजे सर्व अधिकाऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे मनपा भवन ह्या उद्दिष्टांप्रती हे पाय चालत होते.

भक्तशिरोमणी संत तुकाराम महाराज म्हणतात,

पंढरीची वारी जयांचिये घरी ।
पायधुळी शिरी वंदिन त्यांची ।

आम्हा सर्वांचे आम्ही भाग्यच समजतो की, नित्यनेमाने वारी करणाऱ्या वारकऱ्यांसोबत वारीचा आनंद लुटता आला. वारकऱ्यांसमवेत चालत थोडा वेळ त्यांच्या आनंदात दिंडीत सहभागी होता आले. त्यांचे भजनेही आम्ही त्यांच्यानंतर, त्यांच्या सुरात सुर मिळवून म्हणत होतो. हा सुखसोहळा पाहून वाटत होते की, तुकाराम महाराजांना या दिंडी सोहळ्याचे वर्णन किती उचितच केले होते ते म्हणजे,

खेळ मांडियेला वाळवंटी ठाई ।
नाचती वैष्णव भाई रे।।
गोपिचंदन उटी तुळशीच्या माळा।
हार मिरविती गळा।।
टाळमृदुंग घाई पुष्पवर्षाव।
अनुपम्य सुख सोहळा रे ।।
होतो जयजयकार गर्जती अंबर ।
मातले हे वैष्णव वीर रे ।।
तुका म्हणे सोपी केली पायवाट ।
उतरावया भवसागर रे ।।

या संसार भवसागरातून सुटका होणे शक्य नाही. या रहाटगाडग्यामुळे नामस्मरण, जप-तप हे ही शक्य होत नाही. पण ह्या दिंडीमुळे संसार, मोह-माया, स्वअस्तित्व विसरुन पूर्ण दिवस हरिनाम उच्चारणाऱ्याचा योग ह्या कामगार दिंडीने आला. पण खरे पाहता, पाय दुखत होते, याची जाणीव होत होती. कारण एवढे चालण्याचा पहिलाच प्रसंग होता. पण दुसऱ्याच क्षणी इतरांच्या उत्साहाकडे पाहता सारा शिण विसरत होता. सर्वांच्या मनात त्यावेळी एकच भावना उत्पन्न होत असावी ती म्हणजे,

आम्ही लाडके विठूरायाचे ।
लेणे जरी हे दारिद्र्याचे
अभंग ओठी मानवतेचे ।
मृदुंगी वेदनेस विस्मृती।।

या नामस्मरणात वेदना जाणवत नव्हती. मा. श्री. दौंडकर साहेबांनीही अभंग उत्स्फूर्तपणे म्हटले. त्यापैकी एक म्हणजे हा खालील अभंग होय.

आमुची माळियाची जात ।
शेती लावू बागाईत ।।
आम्हा हाती मोट नाडा ।
पाणी जाते फुलझाडा ।।
शांती शेवंती फुलली ।
प्रेमे जाईजुई व्याली ।।
सावताने केला मळा ।
विठ्ठल पायी गोविला गळा ।।

याचबरोबर व्हेईकल डेपोचे कर्मचारी यांनी उत्तम प्रकारे अभंग, भक्तिगीते म्हणून दिंडीमध्ये चैतन्य आणले ते म्हणजे श्री विठ्ठल दगदाळे.

घे घे घे हरिनाम घे ।
माया सारी सोडून दे
हात लावूनी कपाळाला ।
रडशी काय वेड्या
या संसारापायी,या संसारापायी ।।

इत्यादी अभंग समाजप्रबोधनपर भक्तिगीते गात नाचत ही कामगार दिंडी मार्गक्रमण करत होती.

अष्टगंध लेवूनी भाळी ।
जमली वैष्णवांची मेळी ।।
पुणे मनपाची कामगार दिंडी ।
विठ्ठल नामाची आवडी ।।
ज्ञानोबा तुकोबा वदती सारी ।
एकमेका मिसळली सारी ।।
भागवत धर्माची महती न्यारी।
नाही भेद समसमान नर नारी ।।

हेच खऱ्या अर्थाने वारकरी पंथ, भागवत धर्माचे सार आहे. तेच वैशिष्ट्य पुणे मनपा कामगार दिंडीमध्येही दिसून आले. मनाला आंतरिक सात्विक परमानंद लाभला होता. या दिंडीमध्ये पुणे मनपा कामगार युनियनचे कार्याध्यक्ष श्री. प्रकाश जाधव आणि त्यांचे सहकारीही उपस्थित होते.

कामगार दिंडी मनपा भवन येथे आल्यानंतर सर्वांनी फुगड्या खेळल्या. नंतर भजनाचा कार्यक्रम झाला. हरिपाठ झाला व शेवटी पसायदानाने दिंडीचा समारोप झाला

शेवटी म्हणावेसे वाटते की,

धन्य तो दिन पालखी मार्गक्रमणाचा।।
अनंत जन्मीचा शीण गेला ।।
मज वाटे हा ठेवा ब्रम्हानंदाचा ।।
कधी न टळावा हेचि करितो आस ।।
त्रिविध तापाची झाली बोळवण ।।
देखिले चरण वैष्णवांचे ।।
या कारणे घडिला त्यांचा सत्संग ।।
न व्हावा वियोग जन्मोजन्मी ।।
ऐसा या कामगार दिंडीचा महिमा ।।
बोलिजे तितुकी उणी उपमा ।।

सर्वांच्या सहकार्याने, अधिकाऱ्यांच्या उपस्थितीने टाळमृदुंग, भजनाच्या गजरात, दिंडीमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व भाविकांचे मनापासून आभार मानते. आणखी जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांनी सहभागी होवून या दिंडीची शोभा वाढवावी अशी नम्र विनंती करीते. हे वर्णन ज्या अनुभवामुळे करता आले ते कामगार कल्याण निधी, मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) आणि मा. नितीन केंजळे कामगार कल्याण अधिकारी यांची मी अत्यंत ऋणी आहे.

या दिंडी सोहळ्यामध्ये केवळ कर्मचारीच नाही तर त्यांचे कुटुंबही सहभागी होते. सल्लागार (कामगार) कार्यालयातील श्री. धनंजय पागे यांचे चिरंजीव कु. ओंकार पागे हा सलग दोन वर्षे दिंडीला उपस्थित होता. दिंडीचे समग्र फोटोसेशनही त्याने केले आहे.

पुणे मनपा कामगार दिंडीच्या सोहळ्याची दखल घेवून साम मराठी या दूरदर्शन वाहिनीनेही वृत्त प्रसारित केले.

---

## विवेकानंदांचे उपदेश

१. स्वत:समोर ज्याने एखादे ध्येय ठेवले आहे असा माणूस जर हजार चुका करीत असेल तर काहीच ध्येय नसलेला माणूस पन्नास हजार चुका करीत असणार. याबद्दल मला खात्री वाटते, म्हणून स्वत:समोर कोणते ना कोणते ध्येय ठेवणे हे केव्हाही अधिक चांगले आहे.

२. उठा आणि कामाला लागा. हे जीवन आणखी किती दिवस टिकणार आहे? जन्माला आलाच आहात तेव्हा जगात काहीतरी खूण सोडून जा, काहीतरी महत्वाचे कार्य करुन जा. नाहीतर तुमच्यात व वृक्षपाषाणांत काय फरक राहील? ते वृक्षपाषाणदेखील केवळ अस्तित्वात येतात, झिजतात आणि शेवटी नष्ट होतात.

३. ज्यांच्या आत वज्राने बनलेला मनाचा वास आहे असे लोखंडी स्नायू व पोलादी मज्जातंतू मला हवे आहेत.

४. सत्य हे असत्याहून अनंतपटीने प्रभावशाली आहे, चांगुलपणा हा वाईटपणाहून अनंतपटीने प्रभावशाली आहे. जर सत्य व चांगुलपणा ही दोन्ही तुमच्या ठायी असतील तर ती केवळ आपल्या प्रभावानेच आपला मार्ग तयार करुन घेतील.

५. मानवी देहातील आत्मा हाच एकमात्र उपास्य ईश्वर होय. इतर प्राण्यांची शरीरे देखील देवमंदिरे आहेत हे खरे आहे पण मनुष्याचे शरीर हे सर्वश्रेष्ठ मंदिर होय. या मंदिरातील देवाची पूजाच जर मला करता आली नाही, तर इतर मंदिरांपासून मला काय लाभ होणार ?

# माहे जुलै, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३१/७/१३ रोजी कॅ. वडके हॉल येथे जुलै, १३ मधील सेवानिवृत्त ३६ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये २० वयपरत्वे व १६ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री विजय दहिभाते, उप आयुक्त (तांत्रिक) हे उपस्थित



होते. तसेच, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे महानगरपालिका कामगार युनियन हे उपस्थित होते. प्रास्ताविकात मा.नितीन केंजळे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली व सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांना त्यांच्या सेवापूर्तीप्रित्यर्थ मिळणाऱ्या सर्व देय रकमांचा योग्य विनियोग करणेबाबत मार्गदर्शन करुन भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच, मा. प्रकाश जाधव यांनी सर्व सेवानिवृत्त सेवकांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.

तदनंतर मा. दहिभाते यांनी मनपाची दीर्घ सेवा केल्याबद्दल सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचे आभार मानले. तसेच, त्यांना मिळणाऱ्या देय रकमांबाबत खबरदारी का घेतली पाहिजे, याचे पुढीलप्रमाणे मार्मिक उदाहरण देवून महत्व पटवून दिले. एक आजी असते. ती रोज रात्री झोपण्यापूर्वी काहीतरी मोजत असे व तदनंतर झोपत असे. आजीच्या खोलीतून रोज मोजण्याचा आवाज ऐकून तिच्या सर्व मुलाबाळांना आजीकडे भरपुर संपत्ती आहे, आपण आजीचा सांभाळ केला पाहिजे, म्हणजे आजी आपल्याला तिच्याकडील संपत्ती देईल. त्यामुळे सर्व मुले आजीचा चांगला सांभाळ करीत होती. काही दिवसांनी आजी मरण पावली. तदनंतर सर्वांनी तिच्या खोलीत जावून आजीची संदूक उघडली. तर त्यामध्ये खापराचे तुकडे असल्याचे आढळून आले. याचाच अर्थ तुम्ही तुमच्या देय रकमा व्यवस्थित ठेवल्या तर तुम्हालाही तुमची मुलेबाळे व्यवस्थित सांभाळतील, असा मार्मिक सल्ला मा. दहिभाते यांनी दिला व सर्वांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.त्यानंतर सेवानिवृत सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अलका जोशी यांनी व आभार प्रदर्शन श्रीमती सुचेता महाबळेश्वरकर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजनामध्ये श्री. राजपुरे, श्री. गेजगे, श्री. शिंदे, श्री. मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले.


कल्याणवार्ता
जुलै, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या
मतांशी प्रकाशक, संपादक,
कार्यकारी संपादक व पुणे
महापालिका
सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/
१२५२/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


# सत्यशोधक नाटक नव्हे, एक चिल्ला

पान क्र.२ वरुन

संकल्पना या आधी तरी माझ्या डोक्यात होती. परंतु नाटकासाठी श्वासाचा व्यायाम करणं, उच्चार निट यावेत यासाठी दक्षता घेणं, आवाज निट यावा म्हणून गळा शाबूत राखणं, प्रयोगाआधी कितीही थकलेलो असलो तरीही प्रयोगाच्या वेळी मात्र ताजतवानं वाटतयं हे दाखवणं किती अशक्यप्राय गोष्ट आहे ते आज आम्ही बिंधास्तपणे सांगू शकतो.

नाटक ही केवळ टाईमपास म्हणून करण्याची गोष्ट नसून ती एक साधना आहे! एक जीवनशास्त्र आहे हे आज आम्हांला अनुभव घेतांना निश्चित सांगायला आवडेल. नाटकासाठी करावी लागणारी इतर मानसिक व शारिरीक तयारी आता आमच्या रोजच्या जीवनाशी निगडित अशी झालीय. रोजचा प्राणायम, शारिरीक व्यायाम, नियमित आहार हे सगळं नव्याने आम्हा कामगारांच्या जीवनात अगदी सहजपणे सामावून गेलयं याचा आम्हांला नक्कीच आनंद आहे.अतुल सरांच्या सांगण्याप्रमाणे आपण जे करतो त्याचा उपभोग आपल्याला परिपूर्ण रितीने घेता यायला हवा! तरच त्या गोष्टीचा पूर्ण आनंद आपण मिळवू शकतो. मात्र मला हे मुळातच पटत नव्हतं कारण आजपर्यंत असं करायचा प्रयत्न कधीच केला नव्हता. म्हणजे जेवा पण आनंदानं, हसा पण आनंदानं भले काहीही करा पण त्यात आनंद शोधा. नाटक करतांना ते अगदी मनापासून उपभोग घेतोय अशा भावनेने करा! मला आठवतंय त्याप्रमाणे प्रयोग क्र. २५ वझे महाविद्यालय, मुंबई येथे याचा अनुभव मला मिळाला. प्रयोग होता एका छोटयाशा सभागृहात. तिथे माईक किंवा साऊंड काहीच नाही. जे बोलाल ते थेट प्रेक्षकांपर्यंत पोहचणार. २४ प्रयोगात आम्ही कधीच असं नाटक केलं नव्हतं. त्यात सर्व लोक आमच्या अगदी हाताच्या अंतरावर बसलेले.आम्ही प्रवेश करताच एक धडकी मनात येऊन गेली. पण एकाग्रतेसाठी केलेले शारिरीक व मानसिक व्यायाम येथे उपयोगी पडले. दीर्घ श्वास घ्या, थांबा, स्वतःला सूचना द्या आणि पुढे चला .. बस, हाच तो फॉर्म्युला. मी ही तेच केले आणि जसा मी बोलायला लागलो तसा माझाच आवाज मला नव्यानं गोडपणे ऐकू येऊ लागला, माझे शब्द, माझे उच्चार मला तपासता येतील एवढया स्वच्छपणे. मी स्वतःला पाहत होतो. तो आत्मविश्वास, तो अनुभव फक्त आणि फक्त मीच अनुभवत होतो, उपभोगत होतो. माझ्यातील मी मला त्या दिवशी पुन्हा एकदा नव्याने भेटल्याचा आनंद काय होता मी शब्दांत कधीच सांगू शकणार नाही. तो अनुभव मला पुन्हा मोजक्याच प्रयोगात भेटला.

मला वाटतं यापेक्षा अजून काय हवं असतं माणसाला. असाच अनुभव मला काही नाटकातील दृश्य करताना आला. जोतिबा व सावित्री जेव्हा घर सोडतात तेव्हा सावित्री माझ्या (भावाच्या) पाया पडते.ते दृश्य नाटकाचा सराव करतांना पहिल्या वेळी तर मी अगदी गांगरूनच गेलो होतो. त्या प्रसंगात सावित्री माझ्याकडे येते त्यावेळी तिच्या डोळयांत पाणी आलेलं असतं, माझ्या पायाशी वाकून ती नमस्कार करते व मी मात्र उलटया दिशेला तोंड करून हाताने आशिर्वाद देण्याऐवजी हाताची घडी घालतो. प्रसंग एवढाच मात्र एकतर सावित्रीबाई, त्यांच्याविषयी माझ्या मनात असलेलं त्यांचं स्थान आणि त्यात त्या माझ्या पाया पडणारं हे स्विकारणं किती अवघड होतं ते मलाच ठाऊक.

पण सरांनी सांगितलेल्या अभिनयाविषयीच्या अनेक गोष्टींपैकी ही एक पचवावी लागणारी गोष्ट होती एवढं खरं. या नाटकातील प्रत्यक्ष गोष्टींशिवाय जे शिकायला मिळालं ते म्हणजे नाटकाची अद्भुत शिस्त.अद्भुत या अर्थी इतर नाटकांविषयी जे ऐकलं त्यावरून आम्ही करतो ते अद्भुतच आहे हे समजलं.

नाटकाच्या प्रयोगाच्या आदल्या दिवशी आम्ही एकदा सराव करतो. उद्या काय करायचं त्याचं नियोजन आधीचं पक्क केलेलं असतं. ज्या दिवशी प्रयोग असेल त्या दिवशी किमान ३ तास आधी आम्ही बहुतेक सर्वजण त्या ठिकाणी हजर. तिथल्या अनेक समस्या ज्या तिथल्या लोकांनी सोडवायच्या असतात त्या आम्ही आधीच सोडवून मोकळे. म्हणजे रंगमंचाची झाडलोट करणे, खिळे शोधणे, प्रकाश व्यवस्थेला मदत करणे अशी बरीच बारीक-सारीक काम करून आम्ही प्रयोगाच्या आधी एकदा प्रत्येक जण आपआपल्या दृश्यांच्या संवादाची चक्री (नव्याने परिचित झालेला नाटकी शब्द - संवादाचा सराव) मारतो. मग गाण्यांची पट्टी व गाण्यांचा पूर्ण सराव. अहो एवढयावरच संपलं नाही तर दर वेळी दर प्रयोगाला कुठल्या विंगेतून प्रवेश करायचा, कुठल्या विंगेतून बाहेर पडायचं हे एक मोठं दिव्य आम्ही आजही करतो. प्रत्यक्ष नाटक करतांना कधी ध्वनी यंत्रणा वेळेतच आली नाही, कधी प्रकाश योजनेचा अडसर, सगळं असेल तर ती माणसं जागेवर नाहीत, जागेवर असतील तर त्यांना योग्य पद्धतीनं हाताळणं या सगळया गोष्टी अगदी जवळून पाहायल्या मिळाल्या. मग आमच्या ३ तास आधी येण्याचं प्रयोजन हळूहळू आमच्या ध्यानात आलं.

**❖दौऱ्या दरम्यानचे अनुभव –**

या नाटकामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचा एक वर्षाच्या कालावधीत अगदी वरवर का होईना पण अनुभव घेता आला. निरनिराळी माणसं, त्यांच्या बोलीभाषा, त्यांचे पेहराव खूपच वेगळा अनुभव या निमित्तानं मिळाला.

महाराष्ट्रातील डाव्या चळवळी व त्यांच्या माध्यमातून चालणाऱ्या निरनिराळया सामाजिक कार्यांचाही प्रत्यक्ष अनुभव घेता आला. नांदेड इथं असलेल्या रयत संस्थेमार्फत सर्वसामान्यांकरीता चालविल्या जाणाऱ्या इस्पितळाकरीता आम्ही निधी गोळा करण्यासाठी प्रयोग केला, त्यामध्ये किमान १ लाखाच्या आसपास रक्कम गोळा केली. शिरगांव येथील चव्हाण कुटुंबीयांनी चालविलेले विविध उपक्रम आणि त्यांनी समाजसेवेसाठी घेतलेला वसा. या सगळयाचा धुंडाळा घेतांना एक जाणवलं ते म्हणजे आपण किती एकाकी व एककल्ली आयुष्य घेऊन जगतो. जगात दुसऱ्यासाठी निस्वार्थी वृत्तीने जगणारी माणसं पाहिली की आपल्या कफल्लक आयुष्याची कीव आल्यावाचून राहत नाही. पैसा, घर, कुटुंब याही पलिकडे असलेलं हे जग किती सुंदर आहे याचाच हा प्रत्यय.

**नाटकाशी निगडित अविस्मरणीय प्रसंग**

**● संतोष पवार याच्या वडिलांचे निधन–**

नाटकादरम्यान काही आकस्मिक घटना घडल्या. भरत नाट्य मंदीर येथे प्रयोग चालू असतांना ढोलकीवादक संतोष पवार याच्या वडिलांचे निधन झाले. आधी त्याचे वडील आजारी असल्याने तशी थोडीशी माहिती सगळयांना होती. प्रयोग चालू असतांना त्याचा भ्रमणध्वनी सारखा वाजत होता. एवढया ताण-तणावातही त्यानं प्रयोगावर कुठेही त्याचा परिणाम होऊ दिला नाही.

**● दत्ताचा मुलगा आजारी असणं –**

आमच्या पैकीच एक दत्ता शिंदे. जो जोतिबांच्या वडिलांची व रामोशीची भूमिका करतो. त्याचा मुलगा (वय १६) परभणीच्या प्रयोगाच्या आदल्या दिवशी आजारी पडला. त्याला अचानक रूबी हॉल येथे दाखल करावं लागलं. आम्ही सगळे सकाळी निघालो. तो मात्र रात्री जागून दु. ४ वा. परभणीत पोहचला. त्याची स्वतःची मानसिक स्थितीही थोडीशी बरी नसल्याचं आमच्या लक्षात आलं. परंतु संपूर्ण प्रयोग होईपर्यंत मुलाच्या आजारपणाचं दुःख त्यानं कुठही आड येऊ दिलं नाही.

**● चेतनचा हात प्लास्टर–**

चेतन पारसे (रमेश पारसेंचा मुलगा) याचा हात अचानक प्लास्टर करावा लागल्यानं प्रयोगात काय होणारं? याची चिंता सगळयांना लागली होती. मग मीच सरांना सुचवलं की त्याच्या दृश्याच्या वेळी आपण त्याच्या हातावर घोंगड टाकलं तर? आणि दुसरं दृश्य तर पूर्ण पोशाखातच होतं त्यामुळं त्याचाही प्रश्न नाही. झालं! जवळ जवळ सात ते आठ प्रयोग त्यांन असंच हातावर घोंगडी टाकून काम केलं. मात्र प्रेक्षकांना याचा मागमूसही लागला नाही.

**● श्रेयाच्या कांजिण्या आणि अनेकदा ताप**

माझी मुलगी श्रेया (वय साडे पाच वर्ष) हिला २-३ वेळा प्रयोगाच्या वेळी ताप आला होता. तिनंही इतरांप्रमाणेच कुठलाही आजारपणाचा अविर्भाव न आणता प्रयोग अगदी सहजपणे पार पाडला. बीड येथील प्रयोगाच्या आधी एक दिवस तिला कांजिण्या आल्या होत्या. मी व माझी बायको काळजी घेत असून देखील तिचं खाजवणं काही थांबेना. आम्ही तिघही रात्रभर जागेच राहिलो. सकाळी सरांच्या एका मित्राने थोडं औषध दिल्यानं थोडासा आराम तिला मिळाला. परंतु प्रयोगाच्या वेळी मात्र काही घडलंच नाही असा अभिनय केल्याने मला मात्र अश्रू आवरेना.

असे अनेक प्रसंग थोडयाबहुत प्रमाणात आम्हा सर्वांबरोरच घडले. मला तर एकदा पुणे मनपाची कनिष्ठ लिपिक पदाची तर एकदा समाज कल्याण विभागाची समाज सेवक पदाची परीक्षा नाटकामुळे सोडावी लागली. आपण आपले मनोरंजन म्हणून नाटक पाहत असतो. मात्र त्या नाटकाच्या अंतःकरणात रूतलेल्या गोष्टींचा थांगपत्ताही प्रेक्षक म्हणून नसतो हे सांगण्याचा हा हेतू आहे.

या नाटकाच्या निमित्तान माझी बायको अमृता हिनं कधीच घरं सोडलेलं नसतांना संपूर्ण महाराष्ट्र तर पालथा घातलाच शिवाय दिल्ली, कोलकत्ता, म्हैसूर या ठिकाणीही तिला जाता आलं. नाटकाच्या माध्यमातून तिच्याही वैचारिक पातळीवर थोडा बहुत परिणाम नक्कीच झाला. तिनं आठवीत सोडलेलं शिक्षण आता पूर्ण करण्याचा निर्धार केलाय हे नक्की तिच्यासाठी कौतुकास्पद आहे. माझ्या मुलीविषयी तर काय सांगू? नाटकात आजपर्यंत प्रत्येकवेळी टाळया घेणारी ती एकमेव अशी व्यक्ति ठरली आहे. आपल्या डोळयांनी आपल्या मुलीचं यशं पाहणारा माझ्या सारखा नशिबवान बाप फक्त मीच.

शेवटी एवढंच सांगेन की आम्ही नाटक एक माध्यम म्हणून शिकलो परंतु यातून आमची जी जडण घडण, विचारांची घुसळण झाली हेच आमच्या कामगारांसाठी व माझ्या कुटुंबियासाठी महत्वाचं आहे, इथंच थांबतो. धन्यवाद !

(मो.क्र.९९२२२४८७८३
वेबसाईट-www.satyashodhakplay.com)

# मनाच्या सवयी

मनाजवळ इच्छाशक्ती, प्रारब्धशक्ती आणि आत्मशक्ती या तिनही शक्ती आहेत. इच्छाशक्ती ही एक जबरदस्त शक्ती आहे. इच्छाशक्ती हे मनुष्याच्या अस्तित्वाचेच प्रतिक आहे. आपले मन, सतत न थांबता इच्छा करत असते. काही इच्छा होतात आणि विरुन जातात, काही इच्छा स्वप्नवत राहतात, काही इच्छा संकल्पात आणि नंतर कृतीत उतरतात. आपले संपूर्ण जीवन या इच्छाशक्तीमुळे गतिमान राहते. इच्छा शक्ती कशी निर्माण होते, उणीव भासते किंवा अपूर्णता वाटते, तेंव्हा इच्छा होते. माणसाला पैशाची इच्छा होते कारण पैशाशिवाय तो अपूर्ण आहे आणि ज्याच्याजवळ पैसा आहे तो पूर्ण आहे असे त्याला वाटते.

दुसरी शक्ती आहे प्रारब्धशक्ती. ही माणसाच्या पूर्वकर्मांमुळे तयार झालेली असते. माणसाच्या जीवनात कधी कधी ही प्रारब्धशक्ती प्रबल होते आणि इच्छाशक्तीलाही झाकोळून टाकते.तिसरी आहे आत्मशक्ती. म्हणजेच चैतन्यशक्ती. ही शक्ती जेंव्हा जागी होते तेव्हा माणसाला पूर्णतेची अनुभूती देते.

आपल्या जीवनात इच्छाशक्ती आणि प्रारब्धशक्ती इतक्या प्रभावीपणे काम करत असतात की, आपण आपल्याजवळ आत्मशक्ती नावाची शक्ती आहे, हेच विसरुन जातो. कोणी आत्मशक्तीची जाणीव करुन दिली, तरी आपल्याला ती जाणवतच नाही. इतके आपण आपल्या स्वत:बद्दल संवेदनाहीन बनून जातो.

मग आपल्याला आत्मशक्तीचा बोध कधी होईल। जर आपण जीवनात इच्छा आणि प्रारब्धशक्तीचा प्रभाव कमी करु शकलो, तर आत्मशक्ती जाणवेल. कारण आत्मशक्ती ही कोठून बाहेरुनआणण्याची गोष्टच नाही. ती आतच दडलेली आहे.

आत्मशक्ती झाकोळून टाकण्याइतकी इच्छाशक्ती प्रभावी का बनते, त्याचे कारण आहे आपले मन, आत्मशक्तीची जाणीव मनालाच होवू शकते आणि मनच आत्मशक्ती झाकोळून जाईल, असे काम करते. मानवी जीवनात आत्मशक्ती दुर्बल असलेला माणूस हा यशस्वी होवू शकत नाही. म्हणूनच आपण आपल्या मनाचा अभ्यास करायचा. आपणच आपल्या मनाकडे बघायचे, त्याच्या सवयी ओळखायच्या, त्यामुळे घडत गेलेला स्वभाव समजून घ्यायचा, या अभ्यासाचा उपयोग करुन इच्छाशक्तीला वळण द्यायचे आणि आत्मशक्ती जाणवू लागेल एवढे संवेदनशील मनाला बनवायचे. याला आध्यात्म म्हणतात.